नवी मुंबई महानगरपालिका

सार्वत्रिक निवडणूक - 2022

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

## नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) च्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दि. २९ जुलै २०२२

# माहितीपत्रक

- महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. एमसीओ-२०२१/प्रक्र.१९२/नवि-१४, दि. १५ डिसेंबर २०२१ नुसार महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागांमध्ये शक्य तेथवर तीन मात्र, दोनपेक्षा कमी नाहीत आणि चारपेक्षा अधिक होणार नाहीत इतके पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, असे नियम आहेत.
- मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक करिता त्रिसदस्यीय प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरिता प्रभागांच्या अंतिम भौगोलिक सीमा मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२२ / प्र.क्र.२/ का५, दि. ११ मे २०२२ च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.
- त्रिसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ही प्रथम निवडणूक आहे.
- त्रिसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२२ करिता ४० प्रभाग हे ०३ सदस्यीय प्रभाग झाले असून त्यामधून १२० सदस्य व ०१ प्रभाग (प्रभाग क्र. ४१) मधून ०२ सदस्यीय झाले आहेत. अशाप्रकारे एकूण १२२ सदस्य संख्येकरिता एकूण ४१ प्रभाग होत आहेत. ४१ प्रभागांमध्ये एकूण १२२ सदस्य संख्येच्या ५० टक्के पेक्षा कमी नाही म्हणजेच ६१ जागा ह्या महिलांकरिता राखीव राहतील.
- मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. २५ मे २०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार नवी मुंबई महानगरपालिकेने दि. ३१ मे २०२२ रोजी अनुसूचित जाती(महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षण निश्चित करण्यात आले होते. मा. राज्य निवडणूक आयोग यांनी दि. २२ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जाती(महिला), अनुसूचित जमाती व अनुसूचित जमाती(महिला) यांचे आरक्षण हे लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने होत असल्याने व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवल्यामुळे या आरक्षणात कोणताही बदल होत नसल्यामुळे सदर आरक्षण दि. ३१ मे २०२२ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार राहील, असे आदेश दिलेले आहेत.
- मा. समर्पित मागासवर्ग आयोग यांनी केलेल्या शिफारशीनुसार मा. राज्य निवडणूक, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २२ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीकरिता नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता एकूण २५ जागा निश्चित केलेल्या आहेत.
- मा. राज्य निवडणूक आयोग यांच्या कडील दि. २२ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये दि. ३१ मे २०२२ रोजी काढण्यात आलेले **सर्वसाधारण महिलांचे आरक्षण रद्द** करण्यात आले आहे.
- त्यामुळे मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील दि. २२ जुलै २०२२ रोजीच्या सुधारित आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण कायम ठेवण्यात येत आहे. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी व सर्वसाधारण महिलांसाठीचे आरक्षण नव्याने काढण्यात येत असून याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| **१२२** | **११** | **२** | **२५** | **८४** |
| महिला सदस्य संख्या | | | | |
| **६१** | **६** | **१** | **१३** | **४१** |

- नगर विकास विभाग, मंत्रालय यांचेकडील अधिसूचना क्र. एससीओ-२०२१/प्रक्र.१९२/नवि-१४, दि. १५ डिसेंबर २०२१ नुसार महिलांसाठी जागा नेमून देण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे.
  - अ) दोन जागा असलेल्या प्रभागातील एक जागा ही महिलांसाठी राखून ठेवण्यात येईल.
  - ब) तीन जागा असलेल्या प्रभागातील यथास्थिती एक किंवा दोन जागा या, महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.
- अनुसूचित जाती, अनुसूचित जाती(महिला), अनुसूचित जमाती व अनुसूचित जमाती(महिला) यांचे दि. ३१ मे २०२२ रोजीचे आरक्षण कायम ठेवल्यामुळे आजची सोडत खालील तीन टप्प्यात काढण्यात येईल.
  - अ) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग जागा आरक्षित करण्यासाठी.
  - ब) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) जागा आरक्षित करण्यासाठी.
  - क) सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित करण्यासाठी.

# सोडत प्रक्रिया

## अ) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग जागा आरक्षित करण्यासाठी.

१) मा. राज्य निवडणूक आयोग यांनी दिलेल्या आदेशानुसार अनुसूचित जातीच्या ११ जागांचे (प्रभाग २(अ), ४(अ), ५(अ), ६(अ), १०(अ), ११(अ), १२(अ), २३(अ), २४(अ), ३१(अ) व ३२(अ) ) व अनुसूचित जमातीच्या २ जागांचे (प्रभाग क्र.३४(अ) व ११(ब)) अशा एकूण १३ जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.

२) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागेचे आरक्षण निश्चित करण्यासाठी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवलेले प्रभाग वगळून उर्वरित प्रभागामधून सोडत काढून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागांचे आरक्षण निश्चित करण्यात येईल.
त्यानुसार एकूण प्रभागांची संख्या ४१ वजा अनुसचित जाती व जमाती करिता आरक्षित झालेले प्रभागांची संख्या १२ त्यामुळे उर्वरित शिल्लक राहिलेल्या प्रभागांची संख्या– २९ होत आहे.

३) या २९ प्रभागांमधून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग करिता एकूण २५ जागांसाठी सोडत काढण्यात येईल. त्या प्रभागांची माहिती खालीलप्रमाणे-
प्रभाग क्र. १(अ), ३(अ), ७(अ), ८(अ), ९(अ), १३(अ), १४(अ), १५(अ), १६(अ), १७(अ), १८(अ), १९(अ), २०(अ), २१(अ), २२(अ), २५(अ), २६(अ), २७(अ), २८(अ), २९(अ), ३०(अ), ३३(अ), ३५(अ), ३६(अ), ३७(अ), ३८(अ), ३९(अ), ४०(अ), ४१(अ) हे आहेत.

## ब) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) जागा आरक्षित करण्यासाठी.

४) उपरोंक्त सोडतीनुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग करिता एकूण २५ जागा आरक्षित झालेल्या आहेत. त्यापैंकी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता सोडत काढून एकूण १३ जागा आरक्षित करण्यात येतील.

## क) सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित करण्यासाठी.

५) सर्वसाधारण महिलांसाठी उपलब्ध होणाऱ्या जागांची संख्या खालील प्रमाणे आहे.

सर्वसाधारण महिलांसाठी उपलब्ध होणाऱ्या जागांची संख्या = (एकूण महिलांकरीता राखीव असलेल्या जागेंची संख्या) - ((नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखीव असलेल्या जागेंची संख्या) + ( अनुसुचित जातीच्या महिलांकरीता राखीव असलेल्या जागांची संख्या) + अनुसुचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेंची संख्या ))

सर्वसाधारण महिलांसाठी उपलब्ध होणाऱ्या जागांची संख्या = ( ६१ – (१३ + ६ + १) = ६१ – २० =४१)

सर्वसाधारण महिलांसाठी ४१ जागा निश्चित करतेवेळी ज्या प्रभागामध्ये अद्याप एकही जागा महिलांसाठी आरक्षित झाली नसेल असे प्रभाग सर्वसाधारण महिलांकरीता प्रथमत: थेट आरक्षित होतील.

महिलांकरीता अनरक्षित प्रभागांची संख्या = एकूण प्रभाग – ((नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखीव असलेल्या प्रभागाची संख्या) + (अनुसुचित जातीच्या महिलांकरीता राखीव असलेल्या प्रभगाची संख्या) + (अनुसुचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागाची संख्या ))

= ४१ – (१३ + ६ + १=२०) = २१

६) सदरच्या २१ जागा ह्या थेट महिलांकरीता आरक्षित होतील.

७) त्यानंतर प्रभागातील "ब" जागा ज्या महिलांकरिता अनरक्षित असतील, अशा प्रभागांमधून म्हणजे एकूण २२ प्रभागांमधून सर्वसाधारण महिलांच्या आरक्षण निश्चित करण्याकरिता एकूण २० जागांसाठी सोडत काढण्यात येईल.

निवडून द्यावयाच्या महानगरपालिकेच्या सदस्यांची संख्या :- १२२.

प्रभागांची एकूण संख्या :-

| प्रभागातील सदस्य | प्रभाग संख्या |
|---|---|
| ०३ सदस्यीय प्रभाग (अ, ब आणि क जागा) | ४० |
| ०२ सदस्यीय प्रभाग , (अ आणि ब जागा) | ०१ |
| एकूण प्रभाग | ४१ |

प्रवर्गनिहाय आरक्षण :-

| एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| १२२ | ११ | २ | २५ | ८४ |
| महिला सदस्य संख्या | | | | |
| ६१ | ०६ | ०१ | १३ | ४१ |

## आरक्षणाचा तपशील

| प्रभाग क्र. | आरक्षण जागा | | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| १. | | | सर्वसाधारण | |
| २. | अनुसूचित जाती (महिला) | | सर्वसाधारण | |
| ३. | | | सर्वसाधारण | |
| ४. | अनुसूचित जाती (महिला) | | सर्वसाधारण | |
| ५. | अनुसूचित जाती (महिला) | | सर्वसाधारण | |
| ६. | अनुसूचित जाती (महिला) | | सर्वसाधारण | |
| ७. | | | सर्वसाधारण | |
| ८. | | | सर्वसाधारण | |
| ९. | | | सर्वसाधारण | |
| १०. | अनुसूचित जाती (महिला) | | सर्वसाधारण | |
| ११. | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती (महिला) | सर्वसाधारण | |
| १२. | अनुसूचित जाती | | सर्वसाधारण | |
| १३. | | | सर्वसाधारण | |
| १४. | | | सर्वसाधारण | |
| १५. | | | सर्वसाधारण | |
| १६. | | | सर्वसाधारण | |
| १७. | | | सर्वसाधारण | |
| १८. | | | सर्वसाधारण | |
| १९. | | | सर्वसाधारण | |
| २०. | | | सर्वसाधारण | |

| प्रभाग क्र. | आरक्षण जागा | | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | |
| २१. | | | सर्वसाधारण | |
| २२. | | | सर्वसाधारण | |
| २३. | **अनुसूचित जाती** | | सर्वसाधारण | |
| २४. | **अनुसूचित जाती (महिला)** | | सर्वसाधारण | |
| २५. | | | सर्वसाधारण | |
| २६. | | | सर्वसाधारण | |
| २७. | | | सर्वसाधारण | |
| २८. | | | सर्वसाधारण | |
| २९. | | | सर्वसाधारण | |
| ३०. | | | सर्वसाधारण | |
| ३१. | **अनुसूचित जाती** | | सर्वसाधारण | |
| ३२. | **अनुसूचित जाती** | | सर्वसाधारण | |
| ३३. | | | सर्वसाधारण | |
| ३४. | **अनुसूचित जमाती** | | सर्वसाधारण | |
| ३५. | | | सर्वसाधारण | |
| ३६. | | | सर्वसाधारण | |
| ३७. | | | सर्वसाधारण | |
| ३८. | | | सर्वसाधारण | |
| ३९. | | | सर्वसाधारण | |
| ४०. | | | सर्वसाधारण | |
| ४१. | | | [redacted] | **दोन सदस्य प्रभाग** |